# उद्दिष्टे ः

विदयार्थ्यांच्या सुरक्षेचा मुददा महत्वपूर्ण असून शालेय व्यवस्थेत सुरक्षिततेच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे .

1 . **पालक व शाळा व्यवस्थापन समितीची बैठक** ः **31** ऑगस्ट **2024** रोजी आयोजित करणे .

2 . **सुरक्षा समित्या व उपाययोजनांची माहिती** ः सखी सावित्री , विदयार्थी सुरक्षा समिती , विशाखा समिती , तक्रार पेटी व परिवहन समिती याबाबत पालकांना जागरूक करणे .

3 . **लैंगिक छलविरूध्द जागरूकता** ः किशोर – किशोरी मेळावे , good touch bad touch , मासिक पाळीविषयक जागरूकता व मुलींच्या संरक्षणाबाबत आयोजन करणे .

4 . **सामाजिक जनजागृती** ः पालक आणि समाजसेवी घटकांचा सकारात्मक सहभाग सुनिश्चित करणे .

5 . **परवेशीय यंत्रणेमार्फत नियोजन** ः बैठक व कार्यवाहीचा अहवाल फोटोसहीत **31** ऑगस्ट **2024** रोजी सायंकाळी **5** वाजेपर्यंत सादर करणे .

## विदयार्थी सुरक्षाविषयक शासन निर्णय ः

### अ] शाळा व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे ः

1 . शाळा परिसरात विदयार्थ्यांची , शिक्षकांची व इतर कर्मचा-यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे आवश्यक आहे .

2 . खाजगी शाळांनी शासनाच्या निर्देशानुसार निश्चित कालावधीत कॅमेरे बसवणे बंधनकारक आहे . याचे

पालन न करणा-या शाळांवर योग्य कारवाई करण्यात येईल, जसे की अनुदान रोखणे किंवा मान्यता रद्द करणे .

3 . सीसीटीव्ही कॅमेरे बसवले नसलेल्या शाळांनी तात्काळ कार्यवाही करावी .

4 . कॅमेरे बसवल्यानंतर त्यांच्या फुटेजची नियमित तपासणी आवश्यक आहे . मुख्याध्यापकांनी प्रत्येक

आठवडयात तीन वेळा तपासणी करणे आवश्यक आहे . फुटेजमध्ये आक्षेपार्ह बाबी आढळल्यास योग्य ती कारवाई करणे मुख्याध्यापकाची जबाबदारी असेल .

**ब] शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने घ्यावयाची काळजी :**

1 . शाळेतील शिक्षकेतर आणि कर्मचा-यांची निवड करताना त्यांच्या पार्श्वभूमीची योग्य तपासणी करणे आवश्यक आहे, तसेच कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे .

2 . बाहयस्त्रोताव्दारे नियुक्त केलेल्या कर्मचा-यांसाठी , जसे सुरक्षारक्षक , सफाईकामगार , मदतनीस आणि स्कूल बसचे चालक यांची पार्श्वभूमी तपासण्यासाठी शाळा व्यवस्थापनाने स्थानिक पोलिस यंत्रणेशी संपर्क साधणे आवश्यक आहे . नियुक्तीनंतर त्यांच्या सर्व तपशीलांसह छायाचित्र पोलिस यंत्रणेकडे पाठवले जावे .

3 . शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त करताना सहा वर्षाच्या विदयार्थ्यांसाठी महिला कर्मचा-याची नियुक्ती करण्यात यावी .

**क] तक्रार पेटी :**

1 . शालेय विदयार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सर्व शाळांमध्ये तक्रार पेटी बसवण्याचे आदेश शासनाने दिले आहेत . या तक्रार पेटींच्या व्यवस्थापनाची जबाबदारी शाळा व्यवस्थापनावर आणि क्षेत्रीय यंत्रणांवर आहे . तक्रार पेटी उघडण्याची प्रक्रिया आणि त्यातील तक्रारींवर कारवाई करण्याबाबत सविस्तर सूचना शासन पत्रकाव्दारे दिल्या आहेत . शाळा योग्य प्रकारे तक्रार पेटींचा वापर करत आहेत का , याची तपासणी करणे आवश्यक आहे .

2 . तक्रार पेटी बसवणे आणि त्यासंबंधी शासनाच्या नियमांचे पालन करणे मुख्याध्यापकांच्या जबाबदारीत येते . नियमांचे पालन न केल्यास मुख्याध्यापकांवर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते .

**ड] सखी सावित्री समितीबाबतच्या तरतुदींचे अनुपालन ः**

राज्यातील प्रत्येक स्तरावर स्थापन झालेल्या समित्यांनी त्यांना दिलेली कामे ठरलेल्या वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे . विदयार्थ्यांच्या सुरक्षेसाठी या कामांचा आढावा घेणे महत्वाचे आहे .

**इ] विदयार्थी सुरक्षा समितीचे प्रस्ताविक गठन ः**

शालेय विदयार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात विशेषतः लैंगिक छलच्या घटनांचे उच्चाटन करण्यासाठी विदयार्थी सुरक्षा समिती स्थापन करणे आवश्यक आहे . POSH Act 2013 अंतर्गत महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींवर उपाययोजना केल्या जातात त्याचप्रमाणे विदयार्थ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याची गरज आहे . शाळा स्तरावर विदयार्थ्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी सुरक्षा समिती स्थापन करावी जी विदयार्थ्यांशी नितामितपणे संवाद साधून त्यांच्या समस्या सोडवेल .